**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक : ३१/०५/२०२५**

**उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, अर्धापुर जि.नांदेड येथे नेमणुकीस असलेले पोउपनि अयुब कुरैशी व सोबत खाजगी ईसम राजु भिसे पाटील यांनी जनावरांच्या वाहतुकीचा मोबदला म्हणुन ५०,०००/—रूपयांची लाच स्विकारण्यास सहमती दर्शविल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचे जाळ्यात**

| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट** |
|---|---|
| पोलीस ठाणे | ईतवारा जि. नांदेड |
| गुन्हा रजिस्टर नंबर | गु.र.नं १८०/२०२५ कलम ७,७ अ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ सह कलम ६१ (२),६२ भारतीय न्याय संहिता २०२३ |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक ३०/०५/२०२६ रोजी २१.५७ वाजता |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुदद्दा व पत्ता | १) अयुब कुरैशी (शेख), पद पोलीस उपनिरीक्षक, नेमणूक उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, अर्धापूर, ता. अर्धापूर, जि. नांदेड. (वर्ग २ गृह विभाग)<br>२) राजू भिसे पाटील, खाजगी इसम. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५०,००० /— रूपये लाच रक्कम स्विकारण्यास सहमती दर्शवली आहे. |
| लाच स्विकारली रक्कम | --- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे लोडींग ऑटो वाहनामध्ये जनावरांची अर्धापूर येथून वाहतुक करू देण्यासाठी लोकसेवक पोउपनि अयुब कुरैशी (शेख) हे पन्नास हजार रूपये लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार दि. २३/०५/२०२५ रोजी प्राप्त झाली होती.<br>दिनांक २४/०५/२०२५ रोजी पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी केली असता, यातील लोकसेवक पोउपनि अयुब कुरैशी (शेख) यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून स्वत:चा अनुचित आर्थिक फायदा करून घेण्याकरीता तक्रारदार यांचे जनावरे वाहतुकीचे लोडींग ऑटोवर कोणतीही कारवाई न करण्यासाठी लाच मिळविण्याचा प्रयत्न केला. लोकसेवक पोउपनि अयुब कुरैशी (शेख) यांच्यासोबत राहणारे खाजगी इसम राजू भिसे पाटील यांनी पोउपनि अयुब कुरैशी (शेख) यांच्यासाठी लाच स्विकारण्यास सहमती दर्शविली. पोउपनि अयुब कुरैशी (शेख) यांचे एक पोलीस अधिकारी म्हणून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६८ प्रमाणे दखलपात्र अपराध होण्यापासून टाळणे हे त्यांचे कर्तव्य असतांना ते न बजावण्यासाठी त्यांनी खाजगी इसम राजू भिसे पाटील याच्या माध्यमातून लाच मिळविण्याचा प्रयत्न केला. तसेच खाजगी इसम राजू भिसे पाटील याच्याशी संगनमत करून जनावराचे अवैध वाहतुकीस स्वत: ही अटकाव करणार नाही किंवा दुसऱ्यालाही कारवाई करू देणार नाही अशा प्रकारचे षडयंत्र करून जनावरांचे अवैध वाहतूकीचा कट रचला. तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष ५०,०००/— रूपये लाच रक्कम स्विकारण्यास सहमती दर्शवली आहे. म्हणुन त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे ईतवारा येथे वर नमुद प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे |
| मार्गदर्शक | श्री. संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, डॉ. संजय तुंगार अपर पोलीस अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परीक्षेत्र नांदेड |
| पर्यवेक्षक अधिकारी | श्री. प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड |
| गुन्हयाचा तपास | श्रीमती प्रिती जाधव, पोलीस निरीक्षक, लाप्रवि नांदेड, हे करीत आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबदद्ल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.


| संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
|---|---|
| संपर्क कमांक :— 02462—253512<br>टोल फी कमांक— 1064 | ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9359056840 | पोलीस उपअधीक्षक 9359056840 |
| ई—मेल आयडी<br>spacbnanded@mahapolice.gov.in | ई—मेल आयडी<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| FACEBOOK – Dysp Acb Nanded | TWITTER - @ACBnanded |
| INSTAGRAM – acb_nanded | |


पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड